


दैनिक
# आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com

1,22,570
डिजिटल प्रतींचे दररोज सोशल मीडियाच्या माध्यमातून वितरण होणारे
पुण्यातील लोकप्रिय दैनिक



● वर्ष : ०२ ● अंक : २३३ ● पुणे ● रविवार, दि. २७ जुलै २०२५ ● मराठी दैनिक ● पाने ४ ● किंमत : २ रूपये ● RNI No.-MAHMAR/2023/89313





# विसर्जनाची अडचण

यंदाचा गणेशोत्सव आता जेमतेम महिन्यावर आलेला असताना मूर्ती विसर्जनाबाबत निर्माण झालेला पेच मुंबई उच्च न्यायालयाच्या निर्णयामुळे संपुष्टात आला आहे. गणेशोत्सवाची वाढत चाललेली लोकप्रियता, जल्लोषात उत्सव साजरा करण्याची भक्तांची मानसिकता आणि त्यातूनच मूर्तींच्या उंचीबाबत निर्माण झालेली चढाओढ यातूनच गणेशोत्सव, नवरात्रोत्सव तसेच माघी गणेशोत्सवातील मूर्ती विसर्जनाबाबत समस्या निर्माण झाली होती. गणेश मूर्तींची वाढती उंची हा भाविकांच्या उत्साहाचा विषय असला तरी विसर्जन मिरवणुकीसाठी उंच मूर्ती मंडपातून काढणे, विसर्जनस्थळी वाजतगाजत नेणे, रस्त्यादरम्यान होणारी वाहतूक कोंडी, भाविकांचे नृत्य, गणेश भक्तिपर गाण्यांचा जल्लोष यामध्ये मंडपातून निघालेली मूर्ती वाहनातून विसर्जनस्थळी नेईपर्यंत मूर्ती सांभाळणाऱ्या कार्यकर्त्यांना करावी लागणारी तारेवरची कसरत हे एकप्रकारचे अग्निदिव्यच असते. दरवर्षी उंच मूर्ती विसर्जित करताना महापालिका कर्मचारी, सुरक्षा रक्षक, मंडळाचे पदाधिकारी, सदस्यांना द्राविडी प्राणायम करावा लागतो. प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्तींच्या उंचीवरून वादास सुरुवात झाली आहे. पीओपीच्या मूर्तींना बंदी घालण्यात आली असली तरी विविध कारणांमुळे बंदीच्या अंमलबजावणीला अजून यश आलेले नाही. पीओपींच्या मूर्तींचा वाद हा अलीकडच्या गेल्या काही वर्षांमध्ये निर्माण झालेला आहे. मुंबई उच्च न्यायालयाने ३० जानेवारी २०२५ पीओपीपासून बनवलेल्या मूर्ती आणि त्यांचे जलसाठ्यात विसर्जन करण्याविरुद्ध अंतरिम आदेश दिला आणि केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या (सीपीसीबी) मार्गदर्शक तत्त्वांचे काटेकोरपणे पालन करण्याचे आदेश दिले. तथापि, न्यायालयाने आदेश देऊनही बाजारात पीओपीच्या मूर्ती आजही निर्माण होत आहेत. पीओपींच्या मूर्तींमुळे जलप्रदूषण होत असल्याने केंद्र सरकारने त्या मूर्तींच्या विसर्जनास वारंवार आक्षेप घेत शाडूच्या मूर्ती अथवा अन्य पर्यायाचा शोध घेण्यास यापूर्वीच सुचविले आहे. पीओपी पर्यावरणपूरक नाही. ते नद्यांमध्ये,



पाण्यात विरघळू शकत नाही. त्यामुळे नद्या उथळ होतात. दुसरीकडे तलाव किंवा विहिरीत विसर्जन केले, तर नैसर्गिक पाण्याचे स्रोत खराब होतात. त्यामुळे या मूर्तींना नाही तर त्यांच्या विसर्जनाला व त्यातून निर्माण होणाऱ्या जलप्रदूषणाला केंद्र सरकारने वारंवार आक्षेप घेतला आहे. केंद्राचा हेतू पर्यावरणपूरक असला तरी अनेकजण रोजगाराला मुकतील, बेरोजगार होतील, अनेकांना कर्जबाजारी व्हावे लागेल अशा स्वरूपाचे आक्षेप घेत अनेकांनी न्यायालयाचे दरवाजे ठोठावले आहेत. २०१२ पासून केंद्र सरकार पीओपी मूर्तींच्या विरोधात असले, तरी भाविकांची पीओपी मूर्ती खरेदी करण्याची मानसिकता, सार्वजनिक गणेशोत्सव व नवरात्रोत्सव मंडळाचाही याच मूर्ती खरेदीबाबतचा आग्रह यामुळे बाजारात पीओपीच्या मूर्तींवर बंदी येणे तूर्तास तरी शक्य दिसत नाही. धर्म आणि रूढी-परंपरांच्या नावाखाली पर्यावरणाचा विचार सोडून देणे आणि अविचारी पद्धतीने उत्सव साजरे करणे हे मुळात चुकीचे असले तरी आजही कोणी हे समजून घेत नाही, हीच खरी शोकांतिका आहे. मूर्ती बनवणाऱ्यांना मूर्ती बनवण्यासाठी नैसर्गिक, विघटनशील आणि पर्यावरणपूरक कच्च्या मालाचा वापर करण्यास कोणाकडूनही प्रोत्साहित केले जात नाही. त्यातून पीओपी मूर्ती विसर्जनावरून केंद्र सरकार व मूर्ती उत्पादक यांच्यातील वाद उच्च न्यायालयात गेला. न्यायालयाने या वादावर तोडगा काढला असला तरी हा तोडगा हंगामी स्वरूपाचा आहे. कायमस्वरूपी नाही. येणाऱ्या माघी गणेशोत्सवापर्यंतच या तोडग्याची मुदत आहे. सहा फुटांवरील गणेश मूर्तींचे समुद्रात, तर त्याखालील मूर्तींचे कृत्रिम तलावांमध्ये विसर्जन करण्याचे आदेश न्यायालयाने दिले आहेत. पाच फुटांपर्यंतच्या मूर्ती विसर्जनाबाबत कृत्रिम तलावामध्ये न्यायालयाने आदेश दिले असले तरी मुंबई तसेच मुंबई सभोवतालच्या ठाणे, कल्याण-डोंबिवली, नवी मुंबई, पनवेल या एमएमआरए क्षेत्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांवरील जबाबदारी वाढविली आहे. पाच फुटांपर्यंतच्या गणेश मूर्तींच्या विसर्जनासाठी कृत्रिम तलावाची उंची व खोली याचाही स्थानिक प्रशासनाला प्राधान्याने विचार करावा लागणार आहे. गणपतीबाप्पा हा श्रद्धेचा विषय आहे. या मूर्तींचे विसर्जन पारंपरिक पद्धतीने व्हावे असा त्यांचा आग्रह असला तरी गणेश भक्तांची अलीकडच्या काळात विसर्जनाबाबतची मानसिकता बदलली आहे, हा खरोखरीच बदल मानावा लागेल. वाहतूक कोंडी, परिसरापासून काही अंतरावर विसर्जन स्थळ, विसर्जन स्थळी असणारी गर्दी व त्यातून विसर्जनास होणारा विलंब आणि अनेकदा विसर्जनासाठी हमखासपणे असणारी वरुणराजाची हजेरी यामुळे घराजवळच उपलब्ध असणाऱ्या कृत्रिम तलावांचा पर्याय गणेश भक्तांनी स्वीकारला आहे. यात विसर्जनादरम्यान कृत्रिम तलावांमध्ये मूर्ती विसर्जित करण्यास चांगला प्रतिसाद मिळू लागला. पीओपींच्या मूर्ती विसर्जनावर न्यायालयाने दिलेला निर्णय ही केवळ वरवरची मलमपट्टी आहे. कोणत्याही समस्येवर ठोस तोडगा काढणे आवश्यक असते. अन्यथा त्या समस्येचा भस्मासूर होण्यास फारसा वेळ लागत नाही. पीओपींच्या मूर्तींमुळे पर्यावरणाची होणारी हानी, जलप्रदूषण या गोष्टींकडेही कानाडोळा करून चालणार नाही. त्या सत्यतेचा स्वीकार करण्याची मानसिकता आपणास स्वीकारावी लागणार आहे. मूर्ती मोठ्या उंचीची असो व छोटी असो, गणराया सर्वांमध्येच सामावलेले. भक्त गरीब असो वा श्रीमंत, गणराया आशीर्वाद देताना दुजाभाव दाखवत नाही. उंच मूर्ती हा प्रतिष्ठेचा विषय बनविण्याच्या संकल्पनेला कोठे तरी छेद द्यावाच लागेल. विषय श्रद्धेचा असला तरी त्यातून निर्माण होणाऱ्या परिणामांचाही कधी तरी विचार करावाच लागेल. नदी, तलाव, समुद्र या नैसर्गिक पर्यायांशिवाय अन्य पर्यायांचा शोध घेण्यास आपणास मर्यादा पडल्या आहे. शाडूच्या गणेशमूर्तींचे लवकर विसर्जन होते. ती माती आपण शेतामध्ये, बागेमध्ये, उद्यानांमध्ये वापरू शकतो. पीओपी मूर्तींबाबत ते शक्य नाही. पीओपी मूर्तिकारांना माघी गणेशोत्सवापर्यंत न्यायालयीन निर्णयामुळे तूर्तास दिलासा मिळाला आहे.

# देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त कोंडवे धावडेत रक्तदान शिबिर संपन्न

## फडणवीसांच्या वाढदिवसानिमित्त १०१ रक्तदात्यांचे रक्तदान!

**वारजे (दै. आरंभ पर्व)**

राज्याचे लोकप्रिय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा वाढदिवस विविध उपक्रमांनी संपूर्ण राज्यभरात साजरा करण्यात येत आहे.

त्याच अनुषंगाने खडकवासला मतदारसंघातही आ. भीमराव तापकीर यांच्या मार्गदर्शनाखाली विविध कार्यक्रम होत आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून कोंढवे धावडे येथे भव्य रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले. या रक्तदान शिबिरात 101 रक्तदात्यांनी रक्तदान केले. या रक्तदान शिबिरावेळी खडकवासल्याचे लोकप्रिय आमदार भीमराव तापकीर यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमाचे संयोजन खडकवासला भाजपा महिला आघाडी पश्चिम अध्यक्ष मनीषाताई भगवान मोरे , श्री भगवान मोरे यांनी केले.




## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे दूरदृष्टीचे नेतृत्व : आ. तापकीर



यावेळी बोलताना आमदार भीमराव तापकीर यांनी मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा दिल्या. त्यांनी घेतलेल्या दूरदृष्टीच्या निर्णयामुळे महाराष्ट्र प्रगतीपथावर आहे आणि भविष्यातील जाणार आहे असे मत व्यक्त केले. व आगामी काळामध्ये कार्यकर्त्यांना निश्चितपणे संधी दिली जाणार असल्याचे मत व्यक्त केले.

यावेळी रक्तदात्यांचा सन्मान आमदार भीमराव तापकीर यांच्यासह उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. या कार्यक्रमासाठी मंडल अध्यक्ष रुपेश घुले पाटील, खडकवासला भाजपा मतदार संघाचे अध्यक्ष सचिन मोरे, शासन नियुक्त समिती सदस्य सचिन दांगट,

कोंढवे धावडे माजी सरपंच उमेश सरपाटील, बबन धावडे , माजी सरपंच सुभाषभाऊ नाणेकर, अभिजीत धावडे, निखिल धावडे प्रदेश सचिव ओबीसी मोर्चा दत्ताभाऊ कोल्हे, खडकवासला भाजपा सरचिटणीस बापूसाहेब पोकळे,अरुण दांगट, किरण हगवणे अभिषेक कांबळे स्वप्नील पासलकर, खडकवासला मतदारसंघ उपाध्यक्ष रमेश गायकवाड,अनिल मते ,महिला आघाडीच्या पूर्व अध्यक्ष रश्मी घुले पाटील, सायली भोसले ,वृषाली शेलदार, ह.भ.प ममता दांगट , स्मिताताई धावडे यांच्यासह विविध मान्यवर व कार्यकर्ते उपस्थित होते.

# धायरीत बाळूमामाच्या भंडारा उत्सवास भक्तांचा प्रतिसाद

- **बाळूमामाच्या नावानं चांगभलं म्हणत हजारो भक्तांनी घेतले दर्शन**
- **धायरी व परिसरातील भक्त जणांसाठी दरवर्षी बाळूमामांचा भंडारा उत्सव साजरा होणार**
- **राकेश मोरे यांची माहिती माहिती**






**धायरी (दै. आरंभ पर्व)**

सद्गुरू संत श्री बाळूमामा यांचा भंडारा उत्सव सावित्री मंगल कार्यालय धायरी येथे आयोजित करण्यात आला. भंडाऱ्याची उधळण करत बाळूमामाचा जयजकार यावेळी करण्यात आला.

उद्योजक श्री राकेश मोरे यांच्या संयोजनातून हा कार्यक्रम पार पडला. यामध्ये बाळूमामाचे शिष्य, श्री संत हालसिद्धनाथ व श्री संत बाळूमामा भाकणूक कथनकार गुरुमाऊली परमपूज्य कृष्णात ढोणे महाराज यांच्या दर्शन सोहळ्याचे यावेळी आयोजन करण्यात आले होते.

यावेळी बाळूमामांची आरती करून महाप्रसाद वाटप करण्यात आला. यावेळी गुरुमाऊली ढोणे महाराज यांनी भक्तांना आशीर्वाद देत दिले.

प्रत्येकाला सुख समृद्धी प्राप्त होवो. प्रत्येकाचे भले व्हावे चांगले विचार चांगले आचार सर्वांनी आत्मसात करावे. हीच खरी संत बाळूमामांची शिकवण असल्याचे त्यांनी सांगितले. संत बाळूमामाचा आशीर्वाद हा कायम पाठीशी आहे. त्यामुळेच आज सर्व काही आहे. धायरी व परिसरातील न भक्तगणासाठी प्रत्येक वर्षी हा भंडारा उत्सव आयोजित करणार असल्याची माहिती यावेळी राकेश मोरे यांनी दिली.

यावेळी आयोजक युवा उद्योजक राकेश मोरे यांनी कृष्णात ढोणे महाराज यांचा सन्मान केला. यावेळी ढोणे महाराजांच्या प्रमुख उपस्थितीत संत बाळूमामांचा अभिषेक करण्यात आला. आयोजक राकेश मोरे, उद्योजक युवराज जाधव,विशाल पानसरे, प्रवीण कदम. कृष्णा पंडित.. श्रीकांत गाडेकर. नंदिनी मोरे. दिव्या पानसरे. माही मोरे. पृथ्वी मोरे. रोहिणी पंडित. उज्वला मोरे यांच्यासह बाळूमामा यांच्यावर प्रेम करणारे भक्तगण मोठ्या संख्येने उपस्थित होते. अत्यंत भक्तिमय वातावरणात हा कार्यक्रम संपन्न झाला.

# महायुती शिष्टमंडळाची आ. शेखर निकम यांच्यासोबत बैठक

**चिपळूण (दै. आरंभ पर्व)**

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गाच्या चिपळूण शहरातील कामांमध्ये नागरिकांच्या हिताला डावलण्यात आल्याच्या पार्श्वभूमीवर, प्रांत कार्यालय ते कापसाळ दरम्यान उड्डाण पूल व्हावा, या मागणीसाठी महायुतीच्या शिष्टमंडळाची आमदार शेखर सर निकम यांच्यासोबत बैठक नुकतीच पार पडली. या बैठकीत पुढील नियोजन निश्चित करण्यात आले असून, लवकरच संबंधित मंत्र्यांकडे पाठपुरावा करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले. शहरामधून सुरु असलेल्या महामार्गाच्या कामामध्ये हायवे प्रशासनाने सुरुवातीपासूनच नागरिकांच्या हिताचा विचार न करता निर्णय घेतल्याचे आरोप यावेळी करण्यात आले. दर्जाहीन काम, अत्यंत संथ गतीने सुरू असलेले काम, नैसर्गिक जलवाहिन्यांचे अडथळे, पिण्याच्या पाण्याच्या पाइपलाईनची गळती, चुकीचे भराव, अर्धवट अप्रोच रोड, तसेच पाग पॉवर हाऊस, पाग मळा व पाग नाका येथील अपघातग्रस्त सर्कल्स — या सर्व मुद्द्यांवर बैठकीत चिंता व्यक्त झाली.या नियोजनामुळे सुमारे ६ ते ८ हजार रहिवाशांचा जनजीवन विस्कळीत झाले असून, आठ शासकीय कार्यालये, शाळा, वसतिगृहे, हॉस्पिटल्स, समाजभवन आणि वस्ती भागात राहणाऱ्या अल्पसंख्यांक, मागासवर्गीय जनतेला प्रचंड अडचणींचा सामना करावा लागत आहे. अपघातांचे प्रमाण वाढल्याने नागरिक भयभीत झाले असून, वृद्ध, लहान मुले आणि महिलांना रस्ते ओलांडणेही धोकादायक ठरत आहे. या पार्श्वभूमीवर, महायुतीतर्फे प्रांत कार्यालय ते कापसाळ दरम्यान उड्डाण पूल व्हावा, ही जोरदार मागणी करण्यात आली आहे. बैठकीत आमदार शेखर सर निकम यांनी, "मी पूर्वीपासूनच उड्डाण पुलासाठी पाठपुरावा करत आहे.

# पारे चौक घेणार मोकळा श्वास; भूपेंद्र मोरे यांच्या पाठपुराव्याला यश

## ऱ्हेतील “मोरे पॅटर्न” वेधतोय जनतेचे लक्ष

**धायरी (दै. आरंभ पर्व)**

ऱ्हे परिसरातील वाहतूक कोंडीने नागरिकांना अक्षरशा हैराण केले आहे. ह्यातील वर्दळीच्या पारी चौक ते गंधर्व चौक या रस्त्यावर बाजूला एक सीएनजी पंप आहे. या सीएनजी पंप मध्ये गॅस भरण्यासाठी वाहनांची मोठी गर्दी होत असते.

वाहनामुळे तसेच रिक्षामुळे या भागातील नागरिकांना, विद्यार्थ्यांना प्रचंड त्रास होत होता.

परिसरातील सामाजिक कार्यकर्ते श्री. भूपेंद्र मोरे यांनी याबाबतीत महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर यांच्या समवेतच्या आढावा मीटिंगमध्ये ऱ्हे परिसरातील ट्रॅफिकचा विषय मांडला होता. ह्या सीएनजी पंप वाहतुकीमुळे नागरिकांना त्रास होत असल्याचे सांगितले. त्यांच्यासाठी अनधिकृत बांधकाम पाडून त्या ठिकाणी सीएनजी पंप वरील वाहनांसाठी रस्ता करण्यात येणार आहे.






त्याला अनुसरून आज अखेर प्रशासनाने कारवाई करण्यात आली. सीएनजी पंप येथील अनाधिकृत बांधकाम अतिक्रमण आज उध्वस्त करण्यात आले. यामुळे सीएनजी भरण्यासाठी जाणारी वाहने ही सदर ठिकाणाहून प्रवेश करणार आहेते.

साहजिकच रस्त्यावरील वाहतूक सुरळीत होणार आहे. व मोठ्या प्रमाणात ट्रॅफिकचा विषय कमी होणार आहे. मोरे यांनी मांडलेल्या विषयानंतर झालेल्या या कारवाईमुळे नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.. भूपेंद्र मोरे यांच्या कामाच्या पद्धतीला "मोरे पॅटर्न"ही ओळख तयार झाली आहे. त्याचे पडसाद ही ऱ्हे परिसरात उमटत असल्याचे स्पष्ट चित्र दिसत आहे..

> **लांबच लांब रिक्षाच्या लाईन रोज लागत होत्या तसेच पारी चौक ते गंधर्व चौकाला जाणारा रस्ता हा खूप अरुंद आणि त्यात ह्या रिक्षा रोज रस्ता सकाळी जाम करायचे त्यामुळे शाळेत जाणारी मुले व चाकरमानी यांना वाहतूक कोंडीचा सकाळीच सामना करावा लागत होता . रूपालीताई चाकणकर यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या बैठकीमध्ये धायरी व ऱ्हे भागाचा मुख्य वाहतुकीचा प्रश्न होता .त्यामुळे पाठपुरावा करून हा प्रश्न आज खऱ्या अर्थाने मार्गी लागला.**
>
> **- भूपेंद्र मोरे**
> **सामाजिक कार्यकर्ते**

# थोडक्यात



## वाचनाने जीवन समृद्ध होते - ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील

राजगुरूनगर-किरण खुडे (आरंभ पर्व) : माणसाच्या मनाच्या निरोगी वाढीसाठी वाचन आवश्यक असून वाचनाने जीवन समृद्ध होते असे प्रतिपादन खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील यांनी केले. ते हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात मराठी विभागाच्या वतीने वाचनसंस्कृतीच्या प्रचार आणि प्रसारासाठी आयोजित 'पुस्तक भेट' उपक्रमात बोलत होते. याप्रसंगी उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक हिरामण सातकर, खरेदी विक्री संघाचे अध्यक्ष नरेंद्र थिगळे, प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, उपप्राचार्य व्ही.डी.कुलकर्णी, डॉ. संजय शिंदे उपस्थित होते. पुढे बोलताना ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील म्हणाले की, विद्यार्थ्यांनी ज्ञानवृद्धी आणि प्रेरणा देणारे छंद जोपासायला हवेत. आत्मविश्वास, महत्त्वाकांक्षा आणि परिश्रम हा यशाचा राजमार्ग असून विद्यार्थ्यांनी यशापयशाचा विचार न करता सातत्याने प्रयत्न करीत राहायला हवे. विद्यार्थ्यांनी 'मन में है विश्वास' या आत्मकथनातून प्रेरणा घेऊन आपापल्या आयुष्यात यशस्वी होण्यासाठी प्रयत्नशील राहावे, असे सांगितले. यावेळी प्रिया भालशिंगे आणि सृष्टी पवळे या विद्यार्थिनींनी मनोगते व्यक्त केली. विद्यार्थ्यांना वाचनाची गोडी लागावी यासाठी मराठी विभाग प्रमुख डॉ. संजय शिंदे यांच्या माध्यमातून ६५ विद्यार्थ्यांना 'मन में है विश्वास' या पुस्तकाच्या प्रती देण्यात आल्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन डॉ. संजय शिंदे यांनी तर आभार डॉ. बाळासाहेब अनुसे यांनी मानले.

## राजगुरूनगरला कारगिल विजय दिन साजरा; वीरमातांचा सन्मान

राजगुरूनगर-किरण खुडे (आरंभ पर्व) : राजगुरूनगर येथील हुतात्मा राजगुरू, सुखदेव, भगतसिंग स्मृतीशिल्पस्थळी 'कारगिल विजय दिवस 'तालुक्यातील माजी सैनिक व मान्यवरांच्या हस्ते "शहीद स्मारकास" पुष्पचक्र अर्पण करून साजरा करण्यात आला. कारगिल युद्धातील वीरांच्या स्मरणार्थ दरवर्षी २६ जुलै रोजी कारगिल विजय दिवस साजरा केला जातो. हा दिवस देशात आणि राष्ट्रीय राजधानी नवी दिल्ली येथे साजरा केला जातो. राजगुरुनगर शहरात हुतात्मा भगतसिंग, सुखदेव, राजगुरू यांच्या स्मृतीशिल्पस्थळावर वीर जवानांना अभिवादन करून या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी वीरमातांचा सन्मान माजी आमदार दिलीप मोहिते पाटील, खेड तालुका भारतीय जनता पक्षाचे राजगुरूनगर मंडल अध्यक्ष तथा माजी नगराध्यक्ष शिवाजी मांदळे, राजगुरूनगर बँकेचे माजी अध्यक्ष गणेश थिगळे, खेड तालुका राष्ट्रवादी काँग्रेस युवक आघाडीचे अध्यक्ष जयसिंग दरेकर, भारतीय जनता पक्षाचे शिवाजी वाळुंज, नाथा जगदाळे, दत्तात्रय सांडभोर यांच्या हस्ते करण्यात आला. या कार्यक्रमासाठी तालुक्यातील माजी सैनिक, हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाचे एनसीसी विद्यार्थी आणि पोलिस स्पोर्ट्स अकॅडमीचे विद्यार्थी व नागरिक उपस्थित होते. कार्यक्रमाचे संयोजन शिवाजी मांदळे, अमित मोहिते, बबन बोऱ्हाडे, वैशाली पवळे यांनी केले.

## 72.49 लाखांच्या प्रारंभिक किंमतीत सायबरस्टर लॉंच

गुरुग्राम (आरंभ पर्व) : एम.जी सिलेक्ट हा जे.एस.डब्ल्यू एम.जी मोटर इंडियाचा लक्झरी ब्रॅंड चॅनेल आहे आणि त्याने जगातील सर्वात वेगवान एम.जी, म्हणजेच सायबरस्टर लॉंच करण्याचे जाहीर केले आहे. सायबरस्टर ही ब्रॅंडच्या मोटरिंग वारशाचे प्रतीक असून भविष्याच्यादृष्टीने तयार केलेली आहे. सायबरस्टर रु. 74.99 लाख मध्ये नवीन बुकिंगसाठी आणि रु. 72.49 लाख मध्ये पूर्व-आरक्षण करणाऱ्या (प्री-रिझर्व्ह) बुकिंगसाठी उपलब्ध आहे आणि आधुनिक कार्यक्षमता व पारंपारिक उघड्या टॉपच्या मोटरींच्या शाश्वत आकर्षणाचा संयोग साधत आहे. सायबरस्टर ही महान एम.जी.बी च्या भावनेत रुजलेली असून इलेक्ट्रिक काळासाठी रोडस्टरच्या आकृतीची पुनर्भाषा करत आहे, आकर्षक असलेल्या प्रमाणात सजग असे डौलदार प्रमाण, मोहक भाग आणि उच्च-कार्यक्षमता अभियांत्रिकीचे मिश्रण दर्शवित आहे. अनुराग मेहरोत्रा, व्यवस्थापकीय संचालक, जे.एस.डब्ल्यू एम.जी मोटर इंडिया म्हणाले, "एम.जी सिलेक्ट येथे आम्ही अशा अनुभवांची निर्मिती करण्याचे उद्दीष्ट ठेवले आहे ज्यामुळे भावना जागृत होतात, इच्छेला प्रेरणा मिळते आणि जागरूक गतिशीलतेकडे बदलाव करण्यास मदत होते. एम.जी सायबरस्टर ही त्या तत्त्वज्ञानाची सशक्त अभिव्यक्ती आहे. ही एक कार आहे ज्याची अभियांत्रिकी कामगिरी दर्शविण्यासाठी केली गेली आहे आणि त्याचे डिझाइन असे केले गेले आहे जेणेकरून ती लक्षात राहील.

दैनिक आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
RNI No.-MAHMAR/2023/89313

**तुमच्या प्रश्नांना आवाज देणारे एकमेव व्यासपीठ : 'दैनिक आरंभपर्व'!**

*आजच्या माध्यमांच्या गर्दीत जिथे अनेक आवाज दडपले जातात, तिथे दैनिक आरंभपर्व तुमच्या प्रत्येक समस्येला, प्रश्नांना, कार्याला आणि जनतेच्या भावना मांडण्यासाठी अखंडपणे कार्यरत आहे - न थकता, न थांबता!*
*माध्यमांच्या शर्यतीत सहभागी नसलो तरी...*
***तुमचा आवाज योग्य ठिकाणी पोहोचवण्यासाठी आम्ही आजही मैदानात आहोत आणि सदैव राहणार आहोत. आम्ही कोणत्याही दबावाला बळी न पडता सत्य, सेवा आणि समाजाशी प्रामाणिक राहण्याचा निर्धार केला आहे.***

**नोंदणीकृत व विश्वासार्ह**

'दैनिक आरंभपर्व' हे नोंदणीकृत वृत्तपत्र असून, राज्यस्तरावर याची दखल घेतली गेली आहे. यामुळेच आपल्या बातम्या आज विश्वासार्हतेचं प्रतिक ठरत आहेत.

**उद्या अग्रगण्य ठरणारं नाव!**

राजकीय, सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, सांस्कृतिक अशा सर्व क्षेत्रांमध्ये 'दैनिक आरंभपर्व' हे नाव लवकरच अग्रगण्य दैनिक म्हणून पुढे येणार आहे.

# हर्षल पाटील यांचे बलिदान वाया जाऊ देणार नाही

- **थकबाकीविरोधात न्यायालयात जाणार: बीएआय**
- **थकबाकीविरोधात कंत्राटदार उच्च न्यायालयात जाणार**
- **बिल्डर्स असोसिएशन ऑफ इंडियातर्फे हर्षल पाटील यांना श्रद्धांजली**
- **मुंबईत आंदोलन छेडण्याचा इशारा**



**पुणे (दै. आरंभ पर्व)**
जलजीवन मिशनमध्ये १.४० कोटीचे काम करूनही बिले अदा न केल्याने, तसेच या कामासाठी काढलेल्या ६० लाखांच्या कर्जाचे हप्ते भरून न शकल्याने कर्जबाजारी झालेल्या तरुण कंत्राटदाराने आत्महत्या केल्याची घटना दुर्दैवी आहे. राज्यातील विविध विकासकामांमध्ये गुंतलेल्या कंत्राटदारांची सुमारे ९० हजार कोटी रुपयांची थकबाकी राज्य शासनाकडे प्रलंबित आहे. पैसे मिळत नसल्याने कंत्राटदार कंगाल झाले आहेत. शासनाने झालेल्या कामाचे पैसे अदा करावेत, यासाठी दोनवेळा नोटीस पाठवली. मात्र, शासनाकडून त्याला केराची टोपली दाखवली असून, कंत्राटदारांची थकबाकी लवकर अदा करावी, या मागणीसाठी आता मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल करणार असल्याचे बिल्डर्स असोसिएशन ऑफ इंडियाच्या (बीएआय) पदाधिकाऱ्यांनी शुक्रवारी स्पष्ट केले. तसेच मुंबईत तीव्र स्वरूपाचे धरणे आंदोलन करण्याचा इशाराही दिला.

सांगलीच्या वाळवा तालुक्यातील तांदुळवाडी तांदुळवाडी येथील हर्षल अशोक पाटील यांनी कर्जबाजारी होऊन आपली जीवनयात्रा संपवली. हर्षल पाटील यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी 'बीएआय'च्या वतीने शोकसभेचे आयोजन केले होते. संगम पुलाजवळील 'बीएआय'च्या सभागृहात आयोजित शोकसभेला बीएआय महाराष्ट्राचे अध्यक्ष जगन्नाथ जाधव, बीएआय पुणेचे अध्यक्ष अजय गुजर, राज्यसचिव मनोज देशमुख, पुणे केंद्राचे उपाध्यक्ष महेश मायदेव व राजाराम हजारे, सचिव सी. एच. रतलानी, खजिनदार महेश राठी, माजी अध्यक्ष सुनील मते, डॉ. राजीव कृष्णानी, पुणे कॉन्ट्रॅक्टर असोसिएशनचे रवींद्र भोसले आदी उपस्थित होते. हर्षल पाटील यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून, दोन मिनिटे शांतता पाळून श्रद्धांजली वाहण्यात आली.

जगन्नाथ जाधव म्हणाले, "राज्याच्या विविध विभागातील विकासकामे यशस्वीपणे पूर्ण करण्यासाठी राज्यभरात हजारो कंत्राटदार आपले आयुष्य पणाला लावतात. काम पूर्ण केल्यावर बिले निघतील, या आशेवर स्वतःजवळची जमापुंजी गुंतवतात. वेळप्रसंगी दागदागिने मोडून, कर्ज काढून ही कामे पूर्ण करतात.


मात्र, शासनाकडून काम पूर्ण होऊन वर्षे लोटली, तरी पैसे दिले जात नाहीत. त्यामुळे कंत्राटदार मोठ्या संकटात सापडले आहेत. गेल्या तीनचार वर्षांपासून कंत्राटदारांचे सुमारे ९० हजार कोटी रुपये थकीत आहेत. वारंवार पाठपुरावा करूनही शासन त्याची दखल घेत नाही. परिणामी, हर्षल पाटील यांच्यासारखे दुर्दैवी पाऊल उचलले जात आहे. यावर आता कंत्राटदार गप्प बसणार नाहीत. हर्षलचे बलिदान वाया जाऊ देणार नाहीत. उच्च न्यायालयाचे दार ठोठावण्यासह आंदोलनाचा मार्गही अवलंबला जाणार आहे."

अजय गुजर म्हणाले, "हर्षलसारख्या तरुण कंत्राटदाराचे असे अकाली जाणे वेदनादायी आहे. या संवेदनशील विषयातही राज्यकर्ते हर्षल हा सबकॉन्ट्रॅक्टर होता, त्याची सरकारकडे नोंद नाही, अशा संवेदनाहीन प्रतिक्रिया देत आमच्या जखमेवर मीठ चोळत आहेत.

देशाच्या विकासात भरीव योगदान देणाऱ्या, शेती क्षेत्रानंतर सर्वाधिक रोजगार निर्माण करणाऱ्या कंत्राटदारांवर ही वेळ येणे दुर्दैवी आहे. आधीची बिले काढली नसताना, सरकार नवीन कामे काढते. निधीची तरतूद केली जात नाही. तरतूद केली, तर ती अन्य योजनांमध्ये वळवली जाते. त्यामुळे पैसे मिळत नाहीत. कंत्राटदारांचे आयुष्य कंगाल होत आहे. ही थकबाकी दिली नाही, तर येणाऱ्या काळात आत्महत्यांचे हे सत्र वाढत जाईल. सरकारने आमचा अंत पाहू नये."

मनोज देशमुख, डॉ. राजीव कृष्णानी, संजय आपटे यांनीही श्रद्धांजली वाहिली.





# फडणवीसांच्या वाढदिवसानिमित्त शालेय विद्यार्थ्यांना वह्या वाटप

**वारजे (दै. आरंभ पर्व)**
महाराष्ट्र राज्याचे लाडके मुख्यमंत्री मा.श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त शिवणे येथील नवभारत हायस्कूल येथे शालेय विद्यार्थ्यांना वह्या वाटप कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

या कार्यक्रमाचे आयोजन श्री. गणेश वांजळे यांनी केले होते. खडकवासल्याचे आ.भीमराव तापकीर यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करण्यात आले.ह्यावेळी आ तापकीर यांनी ह्याप्रसंगी विद्यार्थ्यांशी संवाद साधत त्यांना शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले. याप्रसंगी आयोजक श्री ,गणेश वांजळे, शासन नियुक्त समिती सदस्य ,भाजपा प्रभाग अध्यक्ष श्री. सचिन दांगट, श्री. भगवान मोरे, श्री. अभिजीत धावडे, श्री. भगवान गायकवाड, श्री. वसंत देशमुख यांच्यासह अन्य भाजपा पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

## मेस्से फ्रँकफर्ट आणि एमईएक्स एक्झिबिशनची धोरणात्मक भागीदारी

**पुणे (दै. आरंभ पर्व)**
'गिफ्ट्स वर्ल्ड एक्स्पो - दिल्ली २०२५'च्या भव्य उद्घाटन सोहळ्यात पेपरवर्ल्ड इंडिया, कॉर्पोरेट गिफ्ट्स शो आणि गिफ्ट्स वर्ल्ड एक्स्पोच्या आयोजकांनी विलीनीकरणाची अधिकृत घोषणा केली.



देशातील उच्च-स्तरीय व्यावसायिक आणि वापर केंद्रांमध्ये मजबूत प्रादेशिक व्यासपीठ उपलब्ध केल्यानंतर आयोजक एक भविष्याचा वेध घेणारे प्रारूप (मॉडेल) सादर करत आहेत. येत्या फेब्रुवारी २०२६ मध्ये होणाऱ्या गिफ्ट्स वर्ल्ड एक्स्पोच्या मुंबई आवृत्तीत दीर्घकालीन कॉर्पोरेट गिफ्ट्स कार्यक्रमाचा कायापालट होईल. तसेच तो 'गिफ्ट्स वर्ल्ड एक्स्पो'च्या छत्राखाली पुनर्स्थापित केला जाईल, जेणेकरून कॉर्पोरेट भेटवस्तूंपुरता मर्यादित न राहता भेटवस्तूंची संपूर्ण श्रेणीच यामध्ये उपलब्ध असेल.

हे पुनर्ब्रँडिंग भेटवस्तू उद्योगासाठी एक सुसंगत आणि एकत्रित व्यासपीठ उपलब्ध करते, जे मागील प्रदर्शनाच्या मजबूत पायावर आणि वारशावर उभारले गेले आहे.

# थोडक्यात




## माजी विद्यार्थ्यांकडून दुर्गम भागातील विद्यार्थ्यांना मदतीचा हात

पुणे (आरंभ पर्व) : नवभारत हायस्कूल,शिवणे तालुका हवेली पुणे माजी विद्यार्थी संघ एस.एस. सी.१९८७ बॅचच्या वतीने चौथ्या वर्षीचा दुर्गम भागातील शाळेत ३७२ विद्यार्थ्यांना हुडी (स्वेटर) वाटपाचा शैक्षणीक कार्यक्रम बुधवार, दि.१६-०७-२०२५ रोजी पार पडला. सदर कार्यक्रमासाठी मुळशी तालुक्यातील आंदगाव केंद्र ८ शाळा,कोळवडे केंद्र ७ शाळा ,आडमाळ केंद्र १४ शाळा या तीन केंद्रांतील ३७२ विद्यार्थ्यांना स्वेटर (हुडी) वाटप करण्यात आले . मागील तीन वर्षात २०२२ ता.भोर मधील निवंगुन केंद्र येथे ३६०हुडी वाटप, २०२३ वरदाडे केंद्र ता हवेली येथे ३५२ विद्यार्थ्यांना स्कूल बॅग वाटप करण्यात आले. ह्याशिवाय २०२४ राजगड पायथा वाजेघर केंद्र आणि पासली केंद्र ता .राजगड येथे ३६८ शालेय साहित्य तसेच जेवणाचे डबे वाटप करण्यात आले. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मारुती किंडरे यांनी केले . या कार्यक्रमासाठी रामभाऊ मोरे ,संदीप देशमुख, महेश इंगळे, सोमनाथ परदेशी, विलास हारपुडे राजेंद्र गिरमे , मुकुंद देशपांडे, हसन शेख, केशव मोरे यांनी परिश्रम घेतले. सदर कार्यक्रमास केंद्रप्रमुख श्री. विजय मारणे , सौ.वृषाली भंडारी श्री.यशवंत पासलकर, दासवेचे सरपंच नितीन मोरे आणि सर्व शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षक वर्ग व विद्यार्थी उपस्थित होते.

## विविध धार्मिक कार्यक्रमांनी सावता महाराज पुण्यतिथी साजरी



**राजगुरूनगर (दै. आरंभ पर्व)**
"कांदा,मूळा, भाजी ! अवघी विठाई माझी !! लसूण,मिरची,कोथिंबीरी!अवघा झाला माझा हरी !!" असा अभंगातून भक्तिरूप संदेश देणारे संत शिरोमणी सावता महाराज यांची पुण्यतिथी वाफगाव(ता. खेड) येथे विविध धार्मिक कार्यक्रमांनी भक्तिभावात साजरी करण्यात आली. यावेळी सावता महाराजांचे जन्मगाव श्रीक्षेत्र अरणभेंडी येथून आणलेल्या प्राणज्योतीची गावातून मिरवणूक काढण्यात आली.





# "रक्तदान हेच श्रेष्ठ दान!" : राजेश पांडे यांचे प्रतिपादन

## फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त कोथरूडमध्ये महा रक्तदान शिबिर

**कोथरूड (दै. आरंभ पर्व)**
मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त, भारतीय जनता पार्टी – कोथरूड मध्य मंडळ यांच्यावतीने कोथरूड मतदारसंघात भव्य महारक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. यामध्ये रक्तदात्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. भाजपा महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस मा. राजेशजी पांडे यांच्या हस्ते या रक्तदान शिबिराचे उद्घाटन झाले. समाजासाठीची जबाबदारी आणि बांधिलकी जपत शेकडो नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत रक्तदान केले. रक्तदान हे श्रेष्ठदान आहे आपण सर्वांनी रक्तदान करणे ही काळाची गरज असल्याचे मत यावेळी राजेश पांडे यांनी व्यक्त केले.

यावेळी मा. नगरसेवक दिलीप अण्णा वेडे पाटील,श्री. निलेश कोंढाळकर, डॉ. संदीप बुटाला श्री. वैभव मुरकुटे (अध्यक्ष, भाजपा कोथरूड मध्य मंडळ) सह भाजप कोथरूड मध्य मंडळाचे सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी मा. नगरसेवक दिलीपअण्णा वेडे पाटील यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. व रक्तदान करणाऱ्या सर्व नागरिकांचे त्यांच्या सामाजिक योगदानाबद्दल मनःपूर्वक कृतज्ञता व्यक्त केली. व त्यांचे आभार मानले.





# ड्रेनेज काम पूर्णत्वास, पोकळे यांच्या पाठपुराव्याला यश

- **नागरिकांच्या समस्यासाठी तत्परता हेच कर्तव्य : बापूसाहेब पोकळे**
- **नागरिकाकडून आ. तापकीर व बापूसाहेब पोकळे यांचा सत्कार**

**धायरी (दै. आरंभ पर्व)**
धायरी गाव मधील लायगुडे वस्ती, साईधाम परिसरातील सोसायट्यांना दोन-तीन वर्षापासून उन्हाळा ,पावसाळा, हिवाळा या दिवसांमध्ये देखील ड्रेनेज चोकअप होणे रोडवरती पाणी येणे सोसायटी मधील पार्किंग मध्ये पाणी शिरणे या समस्यांना सामोरे जावे लागत होते या समस्येबाबत सामाजिक कार्यकर्ते, भारतीय जनता पार्टी खडकवासला सरचिटणीस बापूसाहेब पोकळेंकडे परिसरातील नागरिकांनी याबाबत तक्रार केली. या समस्येचं गांभीर्य लक्षात घेता लगेच बापूसाहेब पोकळे यांनी आ. भीमराव अण्णा तापकीर यांच्या मार्गदर्शनाखाली महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांशी संपर्क साधून या ठिकाणी जी जुनी कमी व्यासाची जीर्ण झालेली लाईन होती ती काढून मोठ्या व्यासाची लाईन टाकावी तातडीने टाकण्यात यावी ही आग्रही मागणी केली होती. त्यावर लगेच महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांनी समस्येचे गांभीर्य लक्षात महानगरपालिकेच्या विशेष निधीतून हे काम मागील महिन्यात पाठपुरावा करून चालू करण्यात आले होते . ते काम पूर्ण झाल्यानंतर आ.भीमराव अण्णा तापकीर यांच्यासह बापूसाहेब पोकळे यांचा नागरिकाकडून सत्कार करण्यात आला. बापूसाहेब पोकळे हे जनतेसाठी धावणारे नेतृत्व ही ओळख आहे. आगामी काळामध्ये त्यांच्या पाठीशी मी खंबीरपणे असणार आहे. आपण सर्वांनी त्यांना अशीच साथ द्यावी अशी साद यावेळी भीमराव तापकीर यांनी उपस्थित नागरिकांना घातली. जनतेसाठी हिरारीने प्रत्येक कार्यात भाग घेणाऱ्या पोकळे यांनी अत्यंत वक्तशीरपणे काम मार्गी लावले.

तातडीने पुणे महानगरपालिकेकडून निधी मंजूर करून घेतला. जवळपास 450 ते 500 मीटर ही लाईन टाकली आहे. याचा फायदा जवळपास 20 ते 25 सोसायट्यांना होणार आहे. त्यामुळे रस्त्यावर होणारे ड्रेनेज व पाणी यांचा प्रश्न जवळपास सुटलाच आहे.

यावेळी प्रभाग अध्यक्ष पै. तुषार पोकळे, संकल्प फाउंडेशनच्या कार्याध्यक्ष यांनी प्रीतीताई पोकळे भाजपाच्या रोहिणी राहणे,राजेश दादा लायगुडे , बालाजी सूर्यवंशी, महेश कांबळे, दीपक शेंडकर ,रविंद्र मोरे ,प्रकाश साठे ,जनार्दन साळुंखे ,सचिन काळे बाळासाहेब गवळी रवींद्र लायगुडे, मोहन शहापूरकर जीचेतन मठपती, लक्ष्मीकांत किनोलीकर, खाडे सर यांच्यासह विविध मान्यवर व नागरिक उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तुषार श्रीहरी पोकळे यांनी केले.

दैनिक आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा

सिंहगड रोड भागातील जनतेचा आवाज.. इथं आहे जनहिताचे सर्व दैनिक आरंभपर्व

**गाव तेथे वार्ताहर**
महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हा,तालुका, शहर आणि ग्रामीण भागात
**वार्ताहर/पत्रकार आणि जाहिरातदार नेमणे आहेत.**

दैनिक आरंभपर्व आरंभ एका नव्या पर्वाचा
या लोकप्रिय दैनिक वृत्तपत्राकरिता महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हा, तालुका, शहर आणि ग्रामीण भागात प्रतिनिधी नेमणे आहेत. इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा.

जॉईन झालेल्या प्रत्येक प्रतिनिधीना आय कार्ड आणि नियुक्ती पत्र दिले जाईल.

*** पात्रता ***
१.समाजसेवेची आवड
२.जनसंपर्क
३.स्मार्ट फोन असणे आवश्यक
४.सोशल मीडियाचा वापर करता येणे

दै.आरंभपर्व मीडिया समूह 7276314142 / 9284559577 / 8605284272

# खडकवासला मतदान पडताळणीवर सचिन दोडके यांचा आक्षेप

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीतील निकालावर शंका उपस्थित करत खडकवासला मतदारसंघातील उमेदवार सचिन दोडके यांनी मतदान पडताळणी प्रक्रियेमध्ये अनियमितता असल्याचा आरोप करत आक्षेप नोंदवला आहे.

मतदानाच्या दिवशी झालेल्या मतदानाची आणि व्हीव्हीपॅट (VVPAT) चिठ्ठ्यांची मोजणी करण्यात न आल्याने ही प्रक्रिया अपूर्ण असल्याचं मत त्यांनी माध्यमांशी संवाद साधताना व्यक्त केलं.

सचिन दोडके व हडपसरमधील उमेदवार प्रशांत जगताप यांनी फेरमतमोजणी आणि पडताळणीसाठी निवडणूक आयोगाकडे अर्ज केला होता. प्रशांत जगताप यांनी कोर्टात याचिका दाखल केल्याने हडपसर मतदारसंघातील पडताळणी झाली. मात्र, खडकवासला मतदारसंघात पडताळणी दरम्यान दोडके यांनी आक्षेप घेतल्यामुळे प्रक्रिया स्थगित करण्यात आली.

दोडके म्हणाले, "मी आयोगाच्या निर्देशानुसार पडताळणीसाठी उपस्थित राहिलो. मात्र येथे प्रत्यक्ष मतदान आणि व्हीव्हीपॅट चिठ्ठ्यांची मोजणी करण्याऐवजी केवळ आकडेवारी दाखवून आणि मॉक पोलिंग करून दोन्ही मशिन्स योग्य असल्याचा दावा केला जात होता. ह्यावर मी आक्षेप घेतला. आम्ही भरलेली फी ही मतदान व व्हीव्हीपॅट चिठ्ठयांची मोजणीसाठी होती, आकडेवारी पाहण्यासाठी नव्हे." त्यांनी स्पष्ट केलं की, जनतेने त्यांच्यावर दाखवलेला विश्वास आणि संपूर्ण महाराष्ट्रात ईव्हीएम मशिन्सबाबत असलेली शंका लक्षात घेता, "ही प्रक्रिया पारदर्शक असायला हवी. खऱ्या अर्थाने दूध का दूध, पाणी का पाणी होणं गरजेचं आहे."



- **"दूध का दूध, पाणी का पाणी व्हावं"**

"लोकशाही मजबूत ठेवण्यासाठी मतदान यंत्राची पारदर्शक पडताळणी अत्यावश्यक आहे. त्यामुळे निवडणूक आयोगाने तात्काळ दखल घेऊन प्रत्यक्ष मतदान आणि व्हीव्हीपॅटची मोजणी करून निष्पक्षता सिद्ध करावी," असं आवाहनही त्यांनी केलं.

दरम्यान, यावर प्रतिक्रिया देताना निवडणूक अधिकारी यशवंत माने म्हणाले, "आम्हाला केवळ निवडणूक आयोगाच्या एसओपीनुसार पडताळणी करण्याचे आदेश आहेत आणि त्यानुसारच प्रक्रिया केली जात आहे."

मात्र, सचिन दोडके यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांवर माने निरुत्तर राहिले. त्यामुळे यापुढे निवडणूक आयोग काय निर्णय घेणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या निकालावर सातत्याने शंका उपस्थित होत असून, सत्ताधारी पक्ष वगळता अनेक नेत्यांनी – ज्यात राहुल गांधी, बाळासाहेब आंबेडकर, उद्धव ठाकरे, राज ठाकरे यांचा समावेश आहे – ईव्हीएम संदर्भात आपली स्पष्ट भूमिका मांडलेली आहे. सचिन दोडके यांचा आजचा आक्षेपही याच पार्श्वभूमीवर महत्त्वाचा ठरतो.

## थोडक्यात




### आरंभपर्वच्या धसक्याने गटाराच्या पाण्याची झाली दुरुस्ती

**लोणी काळभोर-सचिन सुंबे (आरंभ पर्व) : पुणे - सोलापूर महामार्गावर गटाराचे पाणी या शिर्षकाखाली दैनिक आरंभपर्व मध्ये बातमी येताच महामार्ग अधिकारी व पुणे महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांनी धसका घेऊन ताबडतोब त्यांची दुरुस्ती केली असुन तेथे चेंबर बसविले आहे . हे सांडपाणी महामार्गावर वाहत असुन त्यामुळे नागरिकांच्या आरोग्याची व्यथा आरंभपर्व मध्ये मांडली होती . पुणे - सोलापूर महामार्गावर मांजरी फाटा ( द्राक्ष बागेशेजारी ) व शेवाळेवाडी फाटया शेजारी पीएमपीएल बस स्थानका समोर गटाराचे सांडपाणी वाहत असल्याने वाहनचालकांसह पादचाऱ्यांचे मोठे हाल होत होते . सार्वजनिक आरोग्य आणि वाहतूक सुरक्षेच्या दृष्टीने गंभीर प्रश्न निर्माण झाला असून, प्रशासन मात्र याकडे डोळेझाक करत असल्याचा आरोप नागरिकांनी केला होता .गेल्या काही आठवड्यांपासून पुणे - सोलापूर राष्ट्रीय महामार्गावरून सतत गटाराचे पाणी रस्त्यावर येत होते. त्यामुळे महामार्गाच्या कडेला आणि काही ठिकाणी मुख्य मार्गावरही दुर्गंधी पसरली होती . त्यामुळे वाहनचालकांना घसरड्या रस्त्यांमुळे अपघातांचा धोका वाढला होता दुचाकीस्वार घसरून जखमी झाल्याचे अनेक प्रकार समोर आले आहेत. किती वेळा तक्रार केली तरी पुणे महानगरपालिका कोणतीही कारवाई करत नाही. या पाण्याच्या दुर्गंधीमुळे महामार्गावरुन जाताना अवघड झाले असुन अनेक नागरिकांना या दुर्गंधीच्या पाण्यामुळे आजारी पडले आहेत .तरी लवकरात लवकर या पाण्याचा बंदोबस्त महानगरपालिकेने करावा असे सामाजिक कार्यकर्ते सागर घाडगे यांनी आरंभपर्वला सांगितले होते. याबाबत महानगरपालिकेला वारंवार कळवले गेले असले तरी आजवर कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही. साफसफाईसाठी ना कामगार पाठवले गेले, ना निचऱ्याची यंत्रणा दुरुस्त करण्यात आली. नागरिकांनी मागणी केली आहे की, गटारांची तात्काळ सफाई करावी निचऱ्याची यंत्रणा नीट कार्यान्वित करावी आणि महामार्गाच्या कडेला सांडपाण्याचा प्रवाह रोखण्यासाठी कायमस्वरूपी उपाययोजना करावी असे शेवाळेवाडी ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच अमोल जगताप यांनी आरंभपर्वच्या माध्यमातून सांगितले होते .त्यामुळे शेवाळेवाडी फाटा येथे ताबडतोब दुरुस्ती केली असुन अमोल जगताप , सागर घाडगे , तसेच नागरिकांनी आरंभपर्वचे अभिनंदन करुन धन्यवाद दिले.**

# खडकवासला ग्रामीण तर्फे भव्य रक्तदान व आरोग्य शिबिर संपन्न

## खडकवासला ग्रामीण कार्यकारणीच्या पदाधिकाऱ्यांना आ. तापकीर यांच्या हस्ते नियुक्ती पत्राचे वाटप

**खडकवासला (दै. आरंभ पर्व)**

राज्याचे कर्तव्यदक्ष मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस साहेब यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून राज्यभरामध्ये विविध उपक्रम आयोजित करण्यात आले.

खडकवासला विधानसभा मतदारसंघातील ग्रामीण मंडलाच्या वतीने विघ्नहर्ता लॉन्स कुडजे येथे आरोग्य शिबीर व भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. त्यास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

खडकवासल्याचे लोकप्रिय आमदार भीमराव अण्णा तपकीर यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये हा कार्यक्रम संपन्न झाला.



खडकवासला ग्रामीण मंडळाध्यक्ष नवनाथजी तागुंदे पाटील , दिव्यांग विकासासाठी चे पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष बाजीराव नाना पारगे यांच्या नेतृत्वाखाली हा कार्यक्रम मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी रक्तदान शिबिरामध्ये ७० रक्तपिशव्या संकलित करण्यात आल्या . व नागरिकांची आरोग्य तपासणी करण्यात आली.

या कार्यक्रमाच्या निमित्त 21 जणांची खडकवासला ग्रामीण मंडल कार्यकारणी जाहीर करण्यात आली.व आमदार भीमराव तापकीर व प्रमुख मान्यवरांच्या हस्ते नियुक्तीपत्र देण्यात आले.

यावेळी बोलताना आ.भीमराव तापकीर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासारखा कर्तबगार मुख्यमंत्री राज्याला लाभणे हे आपले भाग्य आहे. आगामी काळामध्ये ही त्यांच्या नेतृत्वाखाली हे राज्य प्रगतीपथावर निश्चितपणे जाईल.

खडकवासला ग्रामीणभागामध्ये प्रलंबित विकास कामे लवकरात लवकर मार्गी लागतील. याशिवाय आगामी निवडणुकांच्या दृष्टीने आपण सर्वांनी सज्ज राहायला हवे. असे मत आ.तापकीर यांनी मांडले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक दत्ताभाऊ पायगुडे कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन सचिन पायगुडे यांनी केले.

यावेळी सचिन पायगुडे , खडकवासला भाजपा मतदार संघाचे अध्यक्ष सचिन मोरे ,गणेश वर्पे, माजी नगरसेवक राजाभाऊ लायगुडे, शरद उर्फ लाला शेठ जावळकर,मंडल अध्यक्ष नवनाथ तागुंदे, पश्चिम महाराष्ट्र दिव्यांग विकास आघाडी अध्यक्ष बाजीराव नाना पारगे, नंदूशेठ जावळकर , विठ्ठल ठाकर , नवनाथ मोकर ,अजित कांबळे, दत्ताभाऊ पायगुडे ,माणिक निवांगुणे, संतोष वर्पे, राजाराम मातळे ,किरण खिरीड ,सुनील मांढरे यांच्यासह भारतीय जनता पार्टीचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## बूटकॅम्पला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

अवजड उद्योग मंत्रालयाच्या सहकार्याने एफएसआयडीच्या वतीने सीओईपी तांत्रिक विद्यापीठामध्ये समृद्धी या तीन दिवसीय रोटेटिंग मशिनरी बूटकॅम्पचे आयोजन करण्यात आले होते. अंतिम तसेच अंतिमपूर्व (प्री-फायनल) वर्षाच्या विद्यार्थ्यांना रोटेटिंग मशिनरीमधील (टर्बाईन्स, कॉम्प्रेसर्स आणि पम्प्स) व्यावहारिक व उद्योगाशी सुसंगत ज्ञानाने सुसज्ज करणे हा या कार्यक्रमाचा उद्देश आहे. या बूटकॅम्पमध्ये रोटेटिंग मशिनरीची रचना, कार्य आणि समस्येचे निदान याची सखोल माहिती देण्यात आली. व्हायब्रेशन ॲनालिसिस, डायनामिक बॅलन्सिंग आणि सिस्टिम मॉनिटरिंग अशा प्रगत विषयांची माहिती विद्यार्थ्यांनी घेतली. प्रत्यक्ष जगातील यांत्रिक कामाच्या सिम्युलेशन करणाऱ्या 3डी संवादात्मक व्हिज्युअलाईजेशनची त्याला भर देण्यात आली. औद्योगिक वस्तूंचे इंटरनेट (इंडस्ट्रियल इंटरनेट ऑफ थिंग्ज – आयआयओटी) आणि डिजिटल ट्विन तंत्रज्ञान यांचा परिचय हे त्याचे मुख्य आकर्षण ठरले. आधुनिक औद्योगिक वातावरणात स्मार्ट सिस्टिम्समुळे यंत्रांच्या समस्यांचे निदान, कामगिरी आणि भविष्यात्मक देखभाल यांना नवा आकार कसा मिळत आहे, याची सखोल माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली. एफएसआयडीचे प्रॉडक्ट ॲक्सिलरेशनचे संचालक योगेश पंडित म्हणाले, "हा बूटकॅम्प 'प्रवृद्धी' या व्यापक अखिल भारतीय प्रॉडक्ट ॲक्सिलेरेटर कार्यक्रमाचा भाग आहे. आयआयएससीच्या शैक्षणिक मार्गदर्शनाखाली प्रगत उत्पादन प्रणाली आणि यांत्रिकी अभियांत्रिकी क्षेत्रांमध्ये हजारो विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्याचे लक्ष्य या प्रशिक्षण उपक्रमात बाळगण्यात आले आहे. झपाट्याने बदलणाऱ्या उत्पादन क्षेत्रामध्ये भारतातील अभियांत्रिकी पदवीधर हे नेतृत्व करण्यास सक्षम होतील, या दृष्टीने व्हीआर, आयआयओटी आणि क्षेत्रकेंद्रीत मार्गदर्शन यांसारख्या इमर्सिव्ह शैक्षणिक साधनांच्या माध्यमातून या कार्यक्रमाची रचना करण्यात आली आहे.

# मुख्यमंत्री यांचा वाढदिवस विविध उपक्रमानी साजरा

- **कॉंक्रीट रस्त्याचे भूमिपूजन, विद्यार्थ्यांना पॅड वाटप, रक्तदान शिबिराचेही मा. नगरसेवक हरिदास चरवड यांच्यातर्फे आयोजन**

**पुणे - लक्ष्मण साबळे (दै. आरंभ पर्व)**

राज्याचे कार्यतत्पर मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त सर्वत्र विविध सामाजिक उपक्रम राबवण्यात आले.

वडगाव बुद्रुक येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसाच्या निमित्तही विविध कार्यक्रम घेण्यात आले.

खडकवासला विधानसभा मतदार संघ वडगाव बुद्रुक येथे माजे नगरसेवक हरिदासजी चरवड यांच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.



यामध्ये आमदार भीमराव तापकीर यांच्या विकास निधीतून रस्त्याचे भूमिपूजन करण्यात आले. याशिवाय शालेय विद्यार्थ्यांना पॅड वाटप करण्यात आले..

तसेच हरिदास चरवड जनसंपर्क कार्यालय येथे रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले. ह्या सर्व कार्यक्रमांना आ. भीमराव तापकीर उपस्थित राहून मार्गदर्शन केले.

राज्याच्या विकासासाठी धोरणात्मक निर्णय घेणारा आदर्श मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या रूपाने राज्याला मिळाला आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली राज्य विविध क्षेत्रामध्ये अग्रेसर झाले आहे. त्यांनी घेतलेले सर्व निर्णय हे जनतेच्या हिताचे आहे.

त्यामुळे जनकल्याणासाठी त्यांना दीर्घायुष्य लाभो व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा यावेळी तापकीर यांनी दिल्या. हरिदास चरवड म्हणजे परिसरातील जनतेसाठी , पक्षासाठी धडपडणारे नेतृत्व आहे. त्यांच्या कार्याचा मला निश्चितपणे हेवा वाटतो असेही त्यांनी यावेळी बोलताना मत व्यक्त केले.

यावेळी पुणे शहर भाजप अध्यक्ष धीरज घाटे यांनीही या कार्यक्रमाला भेट दिली. रक्तदात्याशी विचारपूस केली. व चरवड यांच्या कार्याला शुभेच्छा दिल्या. रक्तदात्यांचा सत्कार ही प्रमुख मान्यवरांच्या हस्ते यावेळी करण्यात आला.

यावेळी मंडल अध्यक्ष यशवंतबापू लायगुडे, रवींद्र साळेगावकर ,पुनितजी जोशी, बापू दादा मानकर, सुशील भाऊ मेंगडे, विशाल ऊभे, सारंग नवले, अभिजित आढाव, सचिन मनेरे, केदार जाधव, दत्तात्रय देशपांडे, नानासाहेब जाधव, दिग्विजय चरवड, अनंत कांबळे नंदकिशोर गोसावी, यांसह पदाधिकारी उपस्थित होते.

# विविध कार्यकारी सोसायट्यांना मिळणार राज्य सहकारी बँकेचे पाठबळ !

## सोसायटी सक्षम तर गावही सक्षम : केंद्रीय मंत्री मोहोळ

**गावचे अर्थकारण मजबूत ठेवण्यात गावातील सेवा सहकारी संस्था अर्थात सोसायट्यांचा मोठा वाटा असतो. म्हणूनच या सोसायट्यांच्या सक्षमीकरणासाठी मोदी सरकारच्या माध्यमातून यशस्वी प्रयत्न केले जात आहेत. शिवाय ज्या जिल्हा बँका अडचणीत आहेत, त्या बँकांच्या कार्यक्षेत्रातील सेवा सहकारी सोसायट्यांना शिखर बँकेतून थेट कर्ज पुरवठा करण्याच्या सूचना दिल्या आहेत, ज्यावर सकारात्मक निर्णय घेण्यात आला आहे. गावची सोसायटी सक्षम असेल तर गावचे अर्थकारणही सक्षम असते, म्हणूनच सोसायट्यांना कर्जपुरवठा करण्याच्या सूचना दिल्या होत्या.**

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

राज्यातील ३१ जिल्हा सहकारी बँकांपैकी काही बँका अडचणीत आहेत किंवा बंद आहेत. त्यामुळे या जिल्ह्यातील विविध कार्यकारी सोसायट्यांना जिल्हा बँकेकडून होणार वित्त पुरवठा बंद झाला आहे. कर्ज मिळत नसल्याने शेतकरी अडचणीत येत असून यात लक्ष घालून शेतकऱ्यांना मदत करण्याची सूचना केंद्रीय सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेला केली होती. त्यानुसार राज्य सहकारी बँकेने थेट विविध कार्यकारी सोसायट्यांना वित्त पुरवठा करण्याचा निर्णय घेतला आहे आणि कार्यवाहीलाही सुरुवात झाली आहे. या ऐतिहासिक निर्णयामुळे राज्यातील हजारो सेवा सोसायट्यांना आधार मिळणार आहे. आर्थिकदृष्ट्या अडचणीत असलेल्या किंवा बंद पडलेल्या काही जिल्हा बँकामधून विविध कार्यकारी सोसायट्यांना वित्त पुरवठा होत नव्हता.

त्यामुळे अनेक गावातील शेतकऱ्यांना हंगामासाठी कर्ज मिळू शकत नाही. त्यामुळे हंगामासाठी पैसे हवे असतील तर इतर पर्यायांचा अवलंब करावा लागत असल्याची बाब शेतकऱ्यांनी आणि संस्थांनी निदर्शनास आणून दिली होती. केंद्रीय सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी राज्य सहकारी बँकने या विषयात लक्ष घालावे अशी सूचना बँकचे प्रशासक विद्याधर अनास्कर यांना केली होती. आता या नियमांतील बदलामुळे विविध कार्यकारी सोसायट्यांनाही काही निकष पाळून वित्त पुरवठ्याबाबत राज्य सहकारी बँकेशी संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे. ज्या विविध कार्यकारी सोसायट्या गेली तीन वर्षे नफ्यात आहेत, ज्यांचा एनपीए १० टक्क्यांपेक्षा कमी आहे आणि आर्थिक दृष्ट्या सक्षम आहेत, अशा सोसायट्यांना थेट वित्त पुरवठा करण्याचा निर्णय राज्य सहकारी बँकेने घेतला आहे. राज्यात एकूण २१ हजार विविध कार्यकारी सोसायट्या आहेत. या सोसायट्यांमार्फत खरीप आणि रब्बी हंगामासाठी वित्त पुरवठा करण्यात येतो.

# महावितरणची लकी ड्रॉ योजना

**लोणी काळभोर (दै. आरंभ पर्व)**

महावितरणने ऑनलाइन वीज बिल भरणाऱ्या लकीची ड्रॉ योजना ठेवली असून ग्राहकांचा टक्का वाढवण्याच्या हेतूने नवीन डिजिटल ग्राहक योजना सुरू केली आहे. सलग तीन महिने ऑनलाईन पद्धतीने वीज भरणा केल्यास विजेत्या ग्राहकांना बक्षीस मिळू शकते. या योजनेचा पहिला लकी ड्रॉ झाला असून त्यामध्ये उरुळी कांचन उपविभागातील पाच लकी ग्राहकांना स्मार्ट मोबाईल फोन व स्मार्ट वॉच मिळाले आहे . त्यातील तीन ग्राहक हे लोणी काळभोर गावातील आहेत. यामध्ये दिलीप गजेंद्र पालवे यांना स्मार्टफोन बक्षीस मिळाला आहे . स्मार्टवॉच संजय उत्तमराव काळभोर आणि पूजा अर्जुन कोराळे यांना महावितरण कडून मिळाले आहे. जुलै महिन्यात



कमल राज पुरोहित,देवीदास बोराटे, दुर्गा सपकाळ( मोबाईल) परमेश्वर गायकवाड( स्मार्ट watch) तरी सर्व ग्राहकांना महावितरण आव्हान करते की रांगेत उभा राहणे टाळा आणि ऑनलाइन पद्धतीने विज बिल भरा व लकी विजेते व्हा.तसेच अधिकृत संकेतस्थळ यावरून बिल भरावे आणि फसवणूक टाळावी. असे आवाहन महावितरण लोणी काळभोर शाखा, उरुळी कांचन उपविभाग यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा वाढदिवस महारक्तदान शिबिराने साजरा !

## ॲड. प्रसन्नदादा जगताप मित्र परिवारातर्फे महारक्तदान शिबिराचे आयोजन

**पुणे - लक्ष्मण साबळे (दै. आरंभ पर्व)**

महाराष्ट्र राज्याचे लोकप्रिय, कार्यक्षम, अभ्यासू आणि दूरदृष्टी मुख्यमंत्री श्री. देवेंद्रजी फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त आज सिंहगड रोड, कळंबे कॉम्प्लेक्स, अनुश्री हॉल येथे ॲड. प्रसन्नदादा जगताप यांच्यावतीने "सेवा ही संघटन" अभियानाअंतर्गत भव्य महारक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले.

महारक्तदान शिबिराने हा वाढदिवस साजरा करण्यात आला. यावेळी उपस्थित रक्तदात्यांना भेटवस्तू अल्पपोहार याची सोय ॲड प्रसन्नदादा जगताप मित्र परिवारातर्फे करण्यात आली. सकाळी नऊ ते दुपारी अडीच वाजेपर्यंत चालू असलेल्या या शिबिरात 101





रक्तदात्यांनी रक्तदान केले. सिंहगड रोड व परिसरातील नागरिक, युवक, अनेकांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवला. संकलित झालेले सर्व रक्त गरजूंना जीवनदान देण्यासाठी उपयोगी ठरणार आहे. "रक्तदान हेच श्रेष्ठ दान" या भावनेतून प्रेरित होऊन आणि सामाजिक बांधिलकी जपत मुख्यमंत्री महोदयांच्या वाढदिवसाचा योग्य तो अर्थ लावला, याचं खास समाधान वाटत आहे. अशी भावना माजी उपमहापौर ॲड प्रसन्नदादा जगताप यांनी यावेळी व्यक्त केली.

सामाजिक बांधिलकीची जाणीव आणि लोकसेवेची भावना जपणारे हे शिबिर निश्चितच प्रेरणादायी ठरले आणि हा कार्यक्रम अगदी यशस्वीपणे पार पडला.

ह्या शिबिरासाठी रक्तदान करणाऱ्या रक्तदात्यांचे तसेच अनुश्री हॉलचे मालक सचिनजी कळंबे, यांनी हॉल उपलब्ध करून दिल्याबद्दल तसेच आधार रक्तपेढी तर्फे उपस्थित सर्व डॉक्टरांचे व तंत्रज्ञांचे ॲड. प्रसन्नदादा जगताप यांनी आभार मानले.

यावेळी आयोजक माजी उपमहापौर ॲड. प्रसन्नदादा जगताप,नानासाहेब राऊत, रवींद्र चौधरी, सोमशेखर कामतजी, शिवाभाऊ पासलकर, अजय खुडे, राहुल जगताप, रमेश चव्हाण, श्रीकांतजी हिरेमठ, मोहनजी रांजेकर, संगम विश्वकर्मा, दीपक जी मोटे, बाळासाहेब गायकवाड, भारत कांबळे, दीपक कांबळे, महेंद्रजी मारणे, अविनाश देसाई, राहुल सरवदे, यश मोघे, सर्वज्ञ परदेशी, रुद्राक्ष देशमुख, सुनीलजी झोरी, राहुल जोशी, भाऊसाहेब निकम, किरण कुलकर्णी, किशोर कुलकर्णी, शंकर सूर्यवंशी, राजाभाऊ कुंभार तसेच अनेक मान्यवर उपस्थित होते.

उपस्थित रक्तदात्यांनी ॲड प्रसन्नदादा जगताप यांच्या कार्याचे कौतुक व्यक्त केले. अत्यंत उत्साहात हा कार्यक्रम संपन्न झाला.

दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

· ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate · Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. · Mobile No-7276314142 · Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) · E-mail-aparvinfo@gmail.com · Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.